ISSN : 2278 - 6864
UGC CARE Listed Periodically

# शिक्षण आणि समाज
# Education and Society

**Since 1977**

The Quarterly dedicated to the policy of "Education for Social Development and Social Development through Education"

**Vol:44, Issue:03, No.:03, July - September : 2020**

Indian Institute of Education

J. P. Naik Path, Kothrud, Pune-38

# Education and Society

## Indian Institute of Education

**Founders**

Prof. J. P Naik and Dr. Chitra Naik,

Shri. S. D. Gokhale, **Administrator**

**Editorial Board**

Dr. Jayasing Kalake, *Editor*

Dr. P. N. Gaikwad, *Executive Editor*

Dr. Prakash Salavi, *Assistant Executive Editor*

Dr. S. M. (Raja) Dixit

Prof. V. N. Bhandare

Dr. Sharmishtha Matkar

Shailja Sawant, Secretary

**Publisher**
Indian Institute of Education
J.P. Naik Path, 128/2, Kothrud, Pune 411038
Web-site: www.iiepune.org
E-mail: editor.iiepune@gmail.com

---

'Shikshan ani Samaj' (Education & Society), the educational Quarterly is owned, printed and published by the Indian Institute of Education, Pune. It is printed at Pratima Offset, 1B, Devgiri Estate, S.No. 17/1B, Plot No. 14, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune 411038 and Published at Indian Institute of Education, J.P. Naik Path, 128/2, Kothrud, Pune 411038. Editor: Dr. Jayasing N. Kalake Opinions or views or statements and conclusions expressed in the articles which are published in this issue are personal of respective authors. The Editor, Editorial Board and Institution will not be responsible for the same in any way.

19 PATIENTS' AWARENESS TOWARDS PROMOTIONAL ACTIVITIESIMPLEMENTED IN HOSPITAL

20 A STUDY ON ROLE OF FINANCIAL LITERACY AND CREDIT COUNSELLING CENTRES IN PROMOTING FINANCIAL INCLUSION

21 ELECTORAL REFORM AS A PANACEA TO ACCOUNTABLE GOVERNMENT

22 STREET CHILDREN IN ODISHA AND EXISTING LEGAL SUPPORT SYSTEM IN PROTECTING THEIR HUMAN RIGHTS

23 STUDY ON EMOTIONAL STABILITY OF THE COVID19 HEALTH-WORKERS

24 'मूकनायक' ची शताब्दी व त्यातीलविचाराची प्रासंगिकता

Education and Society (शिक्षण आणि समाज) ISSN: 2278-6864
(UGC Care Journal) Vol-44, Issue-3, No.-03, July-September: 2020

# 'मूकनायक' ची शताब्दी व त्यातीलविचाराची प्रासंगिकता

**प्रा. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव** इतिहासविभाग, सहाय्यक प्राध्यापक मा. श्री. अण्णा साहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगलेजि. कोल्हापूर

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजन जागृतीसाठी विविध कालखंडात वेगवेगळीवृत्तपत्रे काढली. त्यापैकी सर्वप्रथम काढलेले वृत्तपत्र मूकनायकहे होय. 31 जानेवारी 1920 रोजी सर्वप्रथम मूकनायक, 3 एप्रिल 1927 रोजी बहिष्कृत भारत, 24 नोव्हेंबर 1930 रोजी 'जनता'व 14 ऑक्टोबर 1956 रोजी प्रबुद्ध भारत वृत्तपत्रे काढली. तसेच, जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धधर्म स्वीकारला तेव्हा त्यांनी जनतायावृत्त पत्राचे नाव बदलून प्रबुद्ध भारत असे ठेवले. नवजागरणाचा इतिहास म्हणजे त्या देशातील पत्रकारितेचाइतिहास असतो. बंद केलेला आवाज बोलका करण्यासाठी बाबासाहेबांची पत्रकारिताधडपडत होती. त्यातूनच मूकनायकचा जन्म झाला. या वृत्तपत्राला आज 100 वर्ष पूर्ण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराची पत्रकारितेचीचार तत्त्वेहोती, ती म्हणजे स्वतंत्रता, समता, बंधुताआणि न्याय!जोपर्यंत या चार तत्त्वांवर भारतीय समाजाची उभारणी होत नाही तो पर्यंत या देशाला एक राष्ट्र म्हणून समर्थपणे उभे राहता येणार नाही, अशी त्यांची धारणा होती. त्यांनी वृत्तपत्राकडे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यमया दृष्टिकोनातून पाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिताही केवळ निरपेक्ष सामाजिक सेवेचे वृत नव्हते तर सामाजिक परिवर्तनातून प्रगत समाज घडविणेवत्यांचा सर्वांगीणविकास करणे हे त्यांचे लक्ष होते. त्यांची पत्रकारिता नवा माणूस व नवी संस्कृती यांचा शोध घेणारीहोती. मूकनायक हे त्यांनी निर्माण केलेले पहिले वृत्तपत्र होते.या वृत्तपत्रातील त्यांचे विचार आजच्या काळातही उपयोगी आहेत.

**उद्देश्य**

मूकनायकवृत्तपत्रातील विचारांची आजच्या परिपेक्षामध्येउपयुक्ततेचा मागोवा घेणे.

**मूकनायकाच्यानिर्मिती मागची भूमिका :**

1917 साली भारतातीलराजकीयस्थिती आणि विविध जातींच्याराजकीयहक्कांची गरज विचारात घेण्यासाठी साऊथबरो कमिशन नेमण्यात आले होते. या कमिशनने देशाच्या विविध भागात जाऊनमहत्त्वाच्या व्यक्तींचीसाक्ष नोंदवली होती.पण अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातून एम. ए., पी.एच.डी. सारख्या पदव्या संपादन करून आलेल्या अशा उच्च शिक्षितडॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साक्षीसाठी बोलावले नव्हते. तेव्हा डॉ. आंबेडकरांनी गव्हर्नरकडे पत्रव्यवहार करून साऊथबरो कमिशन पुढेआपली साक्ष नोंदवण्यासंबंधाने विनंती केली. गव्हर्नरने ही विनंती मान्य केली व डॉ. आंबेडकरांनी या कमिशन कडेअस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ, वार्षिक उत्पन्नाची अट न घालता निवडणूक लढवण्याची मुभा अशा काही मागण्या सादर केल्या. या वेळी बाबासाहेबांना एका गोष्टीची उणीव भासली की, अस्पृश्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारी, त्यांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडणारी वृत्तपत्रे नाहीत; त्यातून त्यांना अस्पृश्यांच्या हिताची चर्चा करणारे, सनातन हिंदूंच्या गुलामगिरीच्या तावडीतून दलितांना मुक्त करण्यासाठी झटणारेएखादे वृत्तपत्र हाती असावे यातून मूकनायकाची निर्मिती झाली.[1]

त्यावेळी बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' वृत्तपत्रापासून येथे काही दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके व मासिके सुरू झाली होती. महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी चळवळीतील 'दीनबंधू' व 'दलितमित्र' या सारखी वृत्तपत्रे अल्प काळात बंद पडली होती. दलितांची म्हणवणारी काही वृत्तपत्रेही निघाली होती. मूकनायकापूर्वी दलितांची 'सोमवंशीय मित्र', 'हिंदी नागरिक', 'विटाळ विध्वंसन' यासारखी वृत्तपत्रे निघाली होती. या वृत्तपत्रांनी पतितांच्या जीवनातील व्यथा

वेदना, आकांत व आक्रोश मांडला होता. पण पुढे तीदेखील बंद पडली होती.[2]अशा पार्श्वभूमीवर मूकनायक सुरू झाले. मूकनायकाचा जन्म म्हणजे आंबेडकरी चळवळीचा मूळारंभ होय!

या कामी त्यांना राजर्षि शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. त्यांनी मूकनायकासाठी अडीच हजार रूपयांची मदत केली.[3] शाहू महाराजांच्या मदतीने 31 जानेवारी 1920 रोजी मूकनायकाचा पाक्षिक म्हणून पहिला अंक प्रसिद्ध झाला. या वृत्तपत्राने समाजसुधारक पत्रकारितेच्या एका नव्या क्रांतीपर्वाला सुरुवात झाली. त्यांनी सामाजिकक्रांतीस पोषक असे संत तुकारामांचे ब्रीदवाक्यमूकनायकाच्या बिरुदावलीच्या रुपाने स्वीकारले.

**काय करू आता धरुनिया भीड |**
**नि:शंक हे तोंड वाजविले ||**
**नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण |**
**सार्थक लाजोनी नव्हेहित ||[4]**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सुमारास सिडनेहॅम या सरकारी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करत होते. त्यामुळे ते उघडपणे मूकनायकाचे संपादक पद स्वीकारणे शक्य नव्हते. या वृत्तपत्राचे संपादक पांडूरंगनंदरामभटकर हे होते. काही कारणाने भटकरांनी राजीनामा दिल्यानंतर संपादकपदी श्री.घोलप यांची नेमणूक झाली. तरीहीमूकनायकातील पहिल्या चौदा अंकातील अग्रलेख हे स्वत: बाबासाहेबांनी लिहिलेले होते.

**अस्पृश्यांच्या प्रश्नांना इतर वृत्तपत्रातील स्थान :**

अस्पृश्यांची कैफियत मांडणारे व त्यांच्या उन्नतीचा विचार करणारे एकपण वृत्तपत्र नव्हते. तर जी वृत्तपत्र होती त्यातही अस्पृश्यांच्या प्रश्नांना स्थान मिळत नव्हते. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकनायकाच्या पहिल्या अंकात म्हणतात, "आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाय योजना सुचविण्यास, तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमान पत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या वृत्तपत्राकडे न्याहाळून पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट जातीची हितसंबंध पहाणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना परवा नसते. इतकेच नव्हे तर केव्हा-केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात." पुढे ते म्हणतात, "अशा वृत्तपत्रांना आमचा एवढा इशारा आहे की, कोणतीहीएखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतरही जातीस बसल्याशिवाय राहणार नाही. 'दीनमित्र', 'जागरूक', 'डेक्कन रयत', 'विजयी मराठा', 'ज्ञानप्रकाश', 'सुबोध पत्रिका', वगैरे पत्रातून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते परंतुब्राह्मणेतर या अवडंबर संज्ञेखाली मोडत असलेल्या अनेक जातीच्या प्रश्नांना ज्यात खल होतो. त्यात बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नाही हे ही उघड आहे. त्यांच्या अतिविकट स्थितीशी संलग्न असलेल्या प्रश्नांची वाटाघाटी करण्यास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हे कोणीही कबूल करील. हीउणीव भरून काढण्यासाठी या पत्राचा जन्म आहे."[6] आजही प्रसार माध्यमांतून गोरगरीब जनतेचे प्रश्न गायब आहेत. त्यांचे काही प्रश्न असू शकतात. या संबंधी समाज व राज्यकर्ते अनभिज्ञ आहेत, असे म्हणावे लागते.

**अस्पृश्यांच्या परिस्थितीचे मूकनायकातून वर्णन :**

मूकनायकाच्यादि. 31 जानेवारी 1920च्या अंकात अस्पृश्यांच्या तत्कालीन परिस्थिती विषयी पुढील प्रमाणे विवेचन आले आहे. 'समाजातील जातीप्रथेमुळे समाजात प्रचंड मोठ्याप्रमाणात विषमता निर्माण झाली आहे. या सामाजिक विषमतेचा बहिष्कृत समाजावर घोर परिणाम झाला आहे. दौर्बल्य, दारिद्र्य व अज्ञान या त्रिवेणी संगमात हा अफाट बहिष्कृत समाज अडकला आहे. दीर्घ काळ अंगी मुरलेल्या दास्यामुळे उद्भवलेली हीनता त्यांना मागे खेचत आहे. आहे ती स्थिती योग्य आहे या पेक्षा बरी स्थिती आपल्या नशिबी नाही. अशा समजुतीचा विघातकपणा ह्या पतितांच्या नजरेस आणण्यात ज्ञानासारखे अंजन नाही. पण अजूनही ज्ञान मिरची मसाल्यासारखे विकत घ्यावे लागत आहे आणि दारिद्र्यामुळे ते दुर्मिळ झाले आहे. कोठे-कोठे तर विकत घेऊ गेले असता ते मिळतही नाही. कारण ज्ञान मंदिरात सर्वच

अस्पृश्यांना प्रवेश होता, असे नाही. नशीब आजमावून पाहण्यास कोठेच जागा नाही. अस्पृश्यांना संधी नाहीत, मोकळीक नाही. दारिद्यामुळे ज्ञान नाही, ज्ञान नसल्यामुळे बल नाही.'[7]

आपण आजही या गोष्टींचा अनुभव घेत आहोत. दलित, भटक्यांच्या स्थितीमध्ये आजही फारसा बदल झाला नाही. पैसा नाही त्यामुळे ते आजही चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊ शकत नाही. दर्जेदार आय.आय.टी.सारख्या संस्थांमधून जी फीस वाढ झाली आहे ती भरण्याची कुवत व तेथील दैनंदिन राहण्या-खाण्यासंबंधीचा खर्च करू शकत नाहीत. जे.एन.यु., नवी दिल्ली येथील विद्यापीठातील वाढलेल्या फीस व त्या संबंधाने होणारे आंदोलन ही उदाहरणे आजच्या शिक्षण पद्धतीसंबंधाने विचार करावयास पुरेशी आहेत, असे म्हणावे लागते.

**जातीभेद व जाती मत्सर यांचे मूकनायकातील वर्णन :**
बाबासाहेबांनी सुरू केलेला'मूकनायक'चालवण्यासाठीपरिस्थिती अतिशय प्रतिकूल होती. मूकनायक या वृत्तपत्राची जाहिरात पैसे देऊनही तत्कालीन वृत्तपत्र 'केसरी'ने छापण्यास नकार दिला.[8]'केसरी' हे वृत्तपत्र लोकमान्य म्हणवण्याऱ्या टिळकांचे होते हे सांगावयास नको. जातीभेद व जाती मत्सर याचे हे उत्तम उदाहरण आहे. मूकनायकाच्या पहिल्याच अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील विषमतेची व जातीभेदाची चिकित्सा केली. त्यात त्यांनी हिंदू धर्मात शिरलेले विषमतेचे स्वरूप जितके कल्पनातीत आहे तितकेच ते निंदास्पदही आहे, असे स्पष्ट करून दाखवले. वर्णव्यवस्था गुणावर अवलंबून नाही तर जन्मावर अवलंबून आहे. जाती व्यवस्था एक मनोरा आहे पण या मनोऱ्याला शिडी नाही. म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. उच्च जातीत जन्मलेला मग तो कितीही अवगुणी असो त्यास खालच्या मजल्यावर ढकलता येत नाही. नीच जातीत जन्मलेला कितीही गुण संपन्न असला तरी त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे त्या मजल्यातच मरावे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे या जातीत परस्पर रोटी-बेटी व्यवहार होत नसल्यामुळे दरएक जात या जिव्हाळयाच्या संबंधात स्वयंवह म्हणजे तुटक आहे.[9]

**स्वराज्याची संकल्पना :**मूकनायकाचे स्वरूप केवळ जाणीव जागृतीचे नव्हते तर नवसमाज निर्मितीचे ते एक प्रारूप होते. या प्रारुपाच्या स्वराज्य संकल्पनेत समाज रचनेतील जातीचा मनोरा नव्हता तर हर एक व्यक्तीस आपला उत्कर्ष करता येईल व समाज व राष्ट्राच्या विकासासाठी योगदान देतायेईल असे सामाजिकआर्थिक व राजकीय न्यायाचे होते. मूकनायकातून दलितांना जागृत करण्याचे काम केले असे नसून सवर्णांनाही आपल्या समाजद्रोही इतिहासाची वास्तविकता तपासून पहावयाचे वेळोवेळी आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या आवाहनाचा उद्देश संपूर्ण भारतीय समाजाच्या एकसंघतेची, एकात्मतेची, समतेची, व स्वातंत्र्याची मागणी होती. म्हणूनच स्वराज्याची सर सुराज्याला नाही स्वराज्याला नाही असे राष्ट्रीय सभेने कितीही म्हटले तरी स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वांची आम्ही 'री' ओढू शकत नाही हे स्वच्छपणे बाबासाहेब प्रतिपादन करतात.[10]

बाबासाहेब राष्ट्रीय सभेच्या धोरणाची चिकित्सा करतात. ते म्हणतात, "इंग्रजी अंमल जाऊन सवर्णांचे राज्य तेवढे येणार असेल तर बहिष्कृतांना पुन्हा नव्या गुलामगिरीत राहवे लागेल. जेलर बदलला तरी जेल तोच अशी अवस्थाबहिष्कृतांची होणार. उद्या येणाऱ्या स्वराज्यात बहिष्कृतांचे स्थान काय ह्या प्रश्नाला खूप महत्व होते. स्वराज्याची सर सुराज्याला नाही या अग्रलेखातबाबासाहेब म्हणतात, 'सुधारलेल्या राज्यातील राज्य पद्धतीचा कल जितका शासनाकडे असतो तितकाच संस्कृतीकडे असतो. त्यापेक्षा अधिक उन्नती कशी होईल याचे मार्ग आखणे, तिची साधने सर्वांना सारखी उपलब्ध करून देणे हा राज्य करण्याचा हेतू शासना इतका किंबहुना आधिक महत्त्वाचा होऊन बसला आहे. आज स्वतंत्र भारतात हा दुसऱ्या हेतूसाठी जनता लढताना दिसते. म्हणजे बाबासाहेबांनी स्वतंत्र राष्ट्राचे महत्त्वाचे कार्य प्रतिपादले होते.[11]त्यांचे राष्ट्र प्रेम हे जाती धर्माच्या विचारा पलीकडे जाऊन लोककल्याणावर स्थिरावते. स्वराज्याबद्दलचे त्यांचे विचार हे पूर्णपणे परंपरामुक्त स्वरुपाचे व्यक्तीविकासाला पोषक असे आहेत. ते पिढ्यांपिढ्या दलित बहुजनांना धर्माने नाकारलेल्याअधिकाराची मागणी स्वराज्याकडे करतात. म्हणजेच दलितमुक्तीच्या व बहुजनमुक्तीच्या कल्पनेतून स्वराज्याकडे पाहतात. एतदेशीय स्वराज्य दलित-शोषित वर्गाला

आणखी गुलाम करणारे राहील. ही त्यांची शंका वास्तवदर्शी आहे. म्हणूनच 'ते हे स्वराज्य नव्हे, आमच्यावर राज्य' असे निर्भीडपणे प्रतिपादीत करतातव म्हणतात, "द्याल तर असे स्वराज्य द्या की त्यात थोडे बहुत आमचेही राज्य असेल."आज राज्यघटनेने दिलेले हक्क अधिकार असतानाही अल्पसंख्यांक स्वत:च्या हक्क अधिकारासाठी लढे उभा राहताना दिसतात.

डॉ. आंबेडकर दलित वृत्तपत्राचे संपादक, संस्थापक व प्रकाशक आहेत. त्यांच्या द्वारा संपादित वृत्तपत्र हे आजच्या पत्रकारितेसाठी मार्गदर्शक आहेत. 'वृत्तपत्रांनी आपल्या आचार संहितेला सोडचिठ्ठी देऊ नये. त्याचबरोबर भडक, विकृत भावनांना उत्तेजित करणारे लिखाण हे लोक मानसाच्या निकोपवाढीसाठी घातक असते', असे डॉ. आंबेडकरांचे प्रामाणिक मत होते.पत्रकारितेला शोषणाचे माध्यम बनविणाऱ्या प्रवृत्तीची त्यांनी नेहमीच निर्भत्सना केली आहे आजच्या प्रसार माध्यमांची दुर्दशा बघताडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारांची उपयुक्तता लक्षात येते.

मूकनायक या पाक्षिकाच्या कार्याचे मूल्यमापन करताना डॉ. गंगाधरपानतावणे म्हणतात, "मूकनायकाने दलितांच्या आकांक्षा रूजविण्याचा जो प्रयत्न केला त्याला ऐतिहासिक महत्व आहे. सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीयक्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर असे स्थान निर्माण केले पाहिजे. ही नवी जाणीव मूकनायकाच्या रुपाने अस्तित्वात आली. अस्पृश्यांमध्ये अस्मिता जागवण्याचे मूकनायकाने अल्पावधीत केलेले कार्य लोकजीवन घडविणारे होते. प्रबोधनाचा तो प्रभावी आविष्कार होता.' मूकनायकात मांडलेले विचार अतिशय मूलभूत असून ते आजही उपयुक्त आहेत असे म्हणावे लागते. त्याची उपयोगिताकालातीत आहे.

**निष्कर्ष :**

मूकनायकातील लेखातून भारतीयसमाज रचना तसेच राजकीयव्यवस्थायाबद्दलच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कल्पना सुस्पष्ट होतात. त्यांना बहिष्कृत वर्गाची सामाजिक जागृती करावयाची होतीच. त्याच बरोबर त्यांना विशेषत्वाने राजकीय जागृती देखील निर्माण करावयाची होती. या सर्वंकष जागृतीचे प्रत्यंतर मूकनायकातील लेखातून उत्कटपणे साकार होते. त्या काळातील इतर अस्पृश्य उद्धारकांच्या बाबतीत दृष्टिकोना संदर्भात हाच मूलभूत फरक सांगता येईल की, ही सर्व समाजसुधारक मंडळी अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे फक्त सामाजिकदृष्टिकोनातून पाहतात. त्यांच्या सुधारणेचे स्वरूप वरवरचे होते. समाजाची रचना संपूर्ण मानवतावादी मुल्यावर करावयाचे धारिष्ट्य व दृष्टीही नव्हती. त्यांच्या सुधारणेत बहिष्कृतांना राजकीय हक्क काही असू शकतात त्याच्यासाठीही प्रयत्न करावेत ही गोष्ट दिसत नाही. उलट डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय सामाजिक जीवनाच्या आणि संस्कृतीच्या सर्वांगीण परिवर्तनाचा विचार निर्भयपणे, दृढपणे तसेच, इतिहासाचा अर्थ बुद्धिवादी भूमिकेतून संशोधकाच्या भूमिकेतून मांडत पुढे नेतात. हे करत असताना त्यांनी हातचे काही राखून ठेवले नाही. कोणाची ही भीड मुरवत बाळगली नाही. या वृत्तपत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार त्या काळातही व्यवस्थापरिवर्तनासाठी उपयुक्त होते व आजही तेवढेच उपयुक्त आहेत.

**संदर्भ :**

1 जोरगुलवारभूषण, शहापूरकर, राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2016, पृ. 122.

2 डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे खंड 19, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता 1920 ते 1928 , डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन 2005, पृ.24.

3 संपा.जाधव रमेश, राजर्षि शाहू महाराज गौरव ग्रंथ, महाराष्ट्र शासन राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मंत्रालय, मुंबई, 2016, पृ. 808.

4 मूकनायक, 31 जानेवारी 1920.

5 जोरगुलवारभूषण, शहापूरकर, राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2016, पृ. 123.

6 मूकनायक, 31 जानेवारी 1920.

7 उपरोक्त.

8 जोरगुलवार भूषण, शहापूरकर, राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2016, पृ. 122.

9 मूकनायक, 31 जानेवारी 1920.

10 डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता 1920 ते 1928, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेखन व भाषणे खंड 19, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्रशासन मुंबई 2005 पृ. 27.

11 मूकनायक, दि. 14 फेब्रुवारी 1920.

12 जोरगुलवार भूषण, शहापूरकर, राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, 2016, पृ. 142. उपरोक्त, पृ.127.